# Dadasaheb Jotiram Godse
## Arts ,Commerce ,Science College ,Vaduj

**Welcome**

**Subject – Sociology , B.A.I Year**

**Dr. Gire S.M.**

# समाजशास्त्र

- **समाजशास्त्र** (Sociology) म्हणजे माणसाचा समाजाशी असलेल्या आंतरसंबंधांचा अभ्यास होय. समाजशास्त्र हे समाजाचे विज्ञान आहे. यात सामाजिक घटक व सामाजिक घडामोडींचा समावेश असतो. समाजाचे मन, मनाचा एकुण कल व समाज पाळत असलेले रीतिरिवाज यांचा शोध या शास्त्रात घेतला जातो. सामाजिक प्रश्नांची उकल करण्यासाठी समाजशास्त्र उपयुक्त असते. हे शास्त्र आंतरविद्याशाखीय स्वरूपाचे आहे. यामुळे याचा मानववंशशास्त्र, भाशाशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास व संख्याशास्त्र अशा अनेक शाखांशी संबंध येतो. यामध्ये लोकांच्या जिवनाचे वास्तव चित्रणचे रुप रेखाटले जाते. लोकांच्या सामाजिक प्रश्नांचे निवारण येथे केले जाते.

# समाज शास्त्राचे जनक

- इ.स. 1839 मध्ये फेरंच समाजषास्त्रज्ञ **ऑगस्त कॉम्त** याने ही संज्ञा सर्व प्रथम उपयोगात आणली.ही संज्ञा (सोसिअस) या लॅटिन आणि (लोगास) या ग्रीक शब्दापासून बनलेली आहे. यातील या शब्दाचा अर्थसोबती व स्वहवे या शब्दाचा अर्थ शास्त्र असा होता. एकुण म्हणजे संगतीचे किंवा सोबतीचे पर्यायाने समाजाचे शास्त्र होय. आगस्ट कौन ने  ही संज्ञा उपयोगात आणण्यापूर्वी समाजाचे अध्यन करणारे शास्त्र हे भौतिक शास्त्राप्रमाणे स्वतंत्रे शास्त्र असावे या हेतूने  सामाजिक भौतिक ही संज्ञा वापरली. परंतु पुढे घटनांच्या अध्ययनासाठी कितपत तंतोतं उपयोगात आणता येतील असा प्रष्न निर्माण झाल्याकारणाने त्यान   च्या ऐवजी   ही संज्ञा वापरली. आणि तेव्हापासून समाजाचे शास्त्र म्हणून  असा शब्द उपयोगात आणला गेला.

# ऑगस्त कॉम्त



# समाजशास्त्राचा अध्ययनविषय

अ. मानवी समाजाचे अध्ययन.
ब्. सामाजिक संबंधाचे अध्ययन.
क्. सामाजिक समुहाचे अध्ययन.
ड्. सामाजिक क्रियांचे अध्ययन.

# मानवी समाजाचे अध्ययनः

समाजशास्त्रा संपूर्ण मानवी समाजाचे अध्ययन केले पाहिजे. समाजशास्त्रात समाजाच्या कोणत्याही एका अंगाचे अध्ययन केले म्हणजे समाजाचे संपूर्ण आकलन होऊ शकत नाही. संस्था किंवा समूह हे घटक स्वतंत्र नसतात ते परस्पर संबंधित व परस्पर अवलंबित असतात. त्यामुळे कोणताही अभ्यास करताना सर्व घटकांचा संदर्भ विचारात घ्यावा लागतो. म्हणून समाजशास्त्राचा अभास विषय संपूर्ण मानवी समाज असला पाहिजे.

# सामाजिक संबंधाचा अभ्यासः

काही अभ्यासकांच्या मते समाजशास्त्राचा अभ्यासविषय सामाजिक संबंध असला पाहिजे कारण त्यांच्या मते मानवी समाज व्यक्ती, व्यक्ती मिळून बनलेला असतो. सर्व व्यक्ती एकमेकांषी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या, संबंधित असतात. समाज म्हणजे सामाजिक संबंधाचे जाळे होय. त्यामुळे समाजशास्त्रात संबंधांचा अभ्यास झाला पाहिजे.

# ३. सामाजिक समुहांचे अध्ययनः

जान्सन यांच्या व्याख्येनुसार समाजशास्त्र अभ्यासविषय सामाजिक समुहांचे अध्ययन असावे. त्यांच्यामते समाज हा एक विशाल समूह आहे. या समूहात अनेक उपसमूह असतात. हे समूह परस्परांषी संबंधित असतात. समाजातील सभासद आपल्या सर्व जीवनावष्यक गरजा एकटयाने भागवू शकत नाहीत. त्यांना एकमेकांचे सहकार्य घ्यावे लागते. यासाठी ते एकत्र येतात. आणि समुहाची निर्मिती होते. म्हणून समाजशास्त्रात सामाजिक समुहांचा अभ्यास झाला पाहिजे.

# ४. सामाजिक क्रियांचे अध्ययनः

मॅक्स वेबर व इतर समाज शास्त्रज्ञानानुसार समाजशास्त्राचा अभ्यासविष सामाजिक क्रिया असला पाहिजे. सामाजिक जीवनात सामाजिक क्रिया मध्यवर्ती असतात. ज्याप्रमाणे मूलद्रव्यात 'परमाणू' जसा लहानात लहान असून देखील अर्थपूर्ण असतो. त्याप्रमाणे सामाजिक क्रिया महत्वाच्या असतात.

वरील बाबींवर समाजशास्त्रात अभ्यास करण्यात यावा असे अभ्यासकांचे म्हणणे आहे.

# Thank You